MHRT080001722017

**नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०१७**

**मधील निशाणी १४९ खालील आदेश**

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २२ विरुध्द मुदतीत वारस रेकॉर्डवर न आणलेणे त्यांचे विरुध्द दावा तांत्रिकदृष्टया अबेट झालेला आहे. सदरचा अर्ज प्रवितादी क्र. २२ विरुध्द झालेला अबेटमेंट सेटअसाईडचा आदेश रद्दबातल करण्यात यावा याकरीता केलेला आहे.

२. वादी प्रस्तुत अर्जात असे नमुद करतात की, प्रतिवादी क्र. २२ यांचा दि. २२/१०/२०२२ रोजी मृत्यू झाला. मात्र मृत्यू दाखला वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे प्रतिवादी क्र. २२ विरुध्द अबेटमेंटचा आदेश पारीत झाला होता. सदरचा अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करण्यात यावा अन्यथा प्रतिवादी क्र. २२ यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे असा युक्तीवाद वादीच्या वकीलांनी केला.

३ . प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर आपले लेखी म्हणणे देवून या अर्जास हरकत घेतलेली आहे. प्रतिवादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, केलेला विलंब हा हेतुपुरस्सर आहे. अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. प्रस्तुत दाव्यातील संपूर्ण अभिलेख, प्रस्तुतचा अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा हा मिळकतीच्या सरस, निरस, तुटक वाटपाकरीता दाखल आहे. वाटपाच्या दाव्यामध्ये सर्व पक्षकाराचे म्हणणे येवून त्यावर

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.14 17:54:08 +0530

गुणदोषावर युक्तीवाद होवून अंतिम निर्णयापर्यत येण्यासाठी प्रतिवादी क्र. २२ यांच्या वारसाचे म्हणणे देखील अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब दाव्याचे व अर्जात केलेल्या मागणीचे स्वरुप बघता प्रतिवादी क्र. २२ यांच्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होवून मिळणेस ते पात्र आहेत. मात्र झालेला विलंब हा योग्य त्या खर्चाच्या रक्कमेसह माफ केला जावू शकतो. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि. १४९ मंजूर करण्यात येतो

२. प्रतिवादी क्र. २२ च्या विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. वादीनी प्रतिवादी क्र. २ ला रक्कम रु २००/- इतकी रक्कम खर्च म्हणून देण्याच्या अटीवर अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करण्यात येतो.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.14 17:54:14 +0530

**(श्रुती ह. पाटील )**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर**
**देवरुख**

**दि. १४/०७/२०२३**

-: **C E R T I F I C A T E** :-

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 17/2017 Exh 151 |
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Jr. Clerk | : | T.N.Khade (Jr. clerk) |
| Court Name | : | Jt. Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 14/07/2023 |
| Order signed by Presiding Officer on | : | 14/07/2023 |
| Order uploaded on | : | 14/07/2023 |